| | | | |
|---|---|---|---|
| CNR No.MHPU120008522024 | दाखल दिनांक | : | १६/११/२०२४ |
| | नोंदणी दिनांक | : | १६/११/२०२४ |
| | निकाल दिनांक | : | ०६/०६/२०२६ |
| | कालावधी | : | वर्षे महिने दिवस<br>०१ ०६ २१ |

**भोर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कनिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी सौ. मिना वामन जाधव )**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३८८/२०२४. निशाणी क्र.१५/ब.**
**गुन्हा नोंद क्र. ६७/२०२४ राजगड पोलिस ठाणे**

| | | |
|---|---|---|
| **अभियोगपक्ष** | : | **महाराष्ट्र शासन तर्फे राजगड पोलीस स्टेशन,** |
| **अभियोगपक्षातर्फे प्रतिनिधीत्व** | :<br>: | **सहा. सरकारी अभियोक्ता**<br>**श्री. वाय.पी. पोरे** |
| **आरोपी** | :<br>: | **जितेंद्र पांडुरंग कुंभार**<br>**वय– ५८ वर्षे, व्यवसाय– मजुरी,**<br>**रा. नायगाव, ता. भोर, जि. पुणे** |
| **आरोपी तर्फे प्रतिनिधीत्व** | : | **ॲड.श्री.आर.डी. खोपडे** |

**भाग – ब**

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद 44 (ii) अन्वये)**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १६/०२/२०२४ |
| फिर्याद दाखल तारीख | १६/०२/२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १६/११/२०२४ |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख | २५/११/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०२/०२/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याची तारीख | ०६/०६/२०२६ |
| न्यायनिर्णय तारीख | ०६/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भातील आदेशाची तारीख | निरंक. आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह याचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **जितेंद्र पांडुरंग कुंभार** | फौ.प्र.सं. क. ४१(अ) प्रमाणे नोटीस | निरंक | ६५ (ई) | निर्दोष | निरंक | निरंक |

## भाग – क

**(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद 44 (ii) अन्वये)**

**अभियोगपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/ बचाव पक्षातर्फे साक्षीदार / न्यायालयीन साक्षीदार**

### अ. अभियोग पक्ष –

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | सुमेध सत्यवान कांबळे | ०६ | पंच साक्षीदार |
| २. | मंगेश दत्तात्रय कुंभार | ०६ | फिर्यादी |

### ब. बचाव पक्ष –

| अनु.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

### क. न्यायालयीन साक्षीदार –

| अनु.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | | |

### अ.अभियोग पक्षामार्फत निशाणी –

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१. | पी.१०/पी.डब्ल्यु.१ | जप्ती पंचनामा |
| ०२. | पी.११/पी.डब्ल्यु.२ | फिर्याद |
| ०३. | पी.१२/पी.डब्ल्यु.२ | छापील प्रथम खबर |

**ब.बचाव पक्षामार्फत निशाणी –**

| अनु. क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**क.न्यायालया मार्फत निशाणी –**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**ड. भौतिक वस्तु**

| अनु.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | | |

**–:: न्या य नि र्ण य ::–**

(दिनांक ०६/०६/२०२६ रोजी पारीत)

आरोपी हा महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५ (ई) अन्वये गुन्हयाचे संपरीक्षेस सामोरे जात आहे.

०२. अभियोगपक्षातर्फे केवळ दोन साक्षीदार तपासले आहेत. आरोपीने त्याच्या बचावाच्या पुष्ठ्यार्थ पुरावा सादर केलेला नाही. आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ३१३ नुसार जबाब नोंदवला असून त्यामध्ये त्याने त्याचेविरुध्द खोटी केस केली असल्याचा बचाव घेतला आहे. अभियोगपक्षातर्फे श्री. पोरे वकील आणि आरोपीतर्फे श्री. खोपडे वकील यांचा युक्तीवाद ऐकला.

०३. आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेला आरोप व अभियोगपक्षाने सादर केलेला पुरावा पाहता खालील प्रश्न माझ्या विचाराधीन येतात त्याचे कारणांसह निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अभियोगपक्षाने शाबीत केले आहे काय की, दि. ०७/१०/२०२३ रोजी १८.२० वा. चे सुमारास मौजे नायगांव गावचे हद्दीत डोंगराजवळील ओढयालगत ता. भोर, जि. पुणे येथे प्रस्तुत आरोपीने त्याच्या कब्जात बेकायदा बिगरपरवाना देशी दारु टँगो पंच कंपनीच्या ९० मिली मापाच्या १५ बाटल्या प्रत्येकी कि. ३५/– प्रमाणे असा एकुण ५२५/– रु. किमतीचा प्रोव्हीबीशन गुन्हयाचा माल जवळ बाळगुन त्याच्या ओळखीच्या लोकांना विक्री करीत असताना मिळुन आला आणि त्याद्वारे त्याने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे अपराध केला ? | **...नाही.** |
| ०२. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## –:: <u>का र ण मी मां सा</u> :–

**<u>मुद्दा क्रमांक ०१ व २ करीताः–</u>**

०४. अभियोगपक्षामार्फत सदर गुन्हा शाबीत करणेकामी फिर्यादी सा.क्र. १ सुमेध सत्यवान कांबळे आणि तपास अधिकारी सा.क्र. २ मंगेश दत्तात्रय कुंभार यांची साक्ष नोंदविण्यात आली आहे. यथोचित संधी देवूनही अभियोग पक्षाने इतर साक्षीदारांना साक्षीकामी हजर न ठेवल्याने अभियोगपक्षाचा दि.०५.०३.२०२६ रोजीच्या नि. क्र.०१ वरील आदेशान्वये पुरावा बंद केला.

०५. फौजदारी न्यायशास्त्राप्रमाणे आरोपीवरील अपराध शंकेच्या पलीकडे जावून शाबीत करण्याची सर्वस्वी जबाबदारी अभियोगपक्षावर असुन

अभिलेखावरील पुराव्यामध्ये एखादी शंका अथवा संशय निर्माण झाल्यास सदर संशयाचा फायदा फौजदारी न्यायशास्त्रानुसार आरोपीस दिला जातो.

०६. भारतीय पुरावा अधिनियमानुसार आरोपीवरील अपराधाचे शाबीतीसाठी अभियोगपक्षाला साक्षीदारांच्या संख्येची आवश्यकता नाही. अभियोगपक्ष केवळ एका साक्षीदाराच्या पुराव्यावरुन अपराध शाबीत करु शकतो. अभियोगपक्षास त्यानुसार अपराध शाबीत करण्यासाठी सादर केलेला साक्षीदाराचा पुरावा सक्षम व विश्वासार्थ असायला पाहिले जेणेकरुन त्यावर विसंबून राहून अपराध शाबीत होत आहे याव्यतिरीक्त दुसरा निष्कर्ष काढता येणार नाही.

०७. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार सा. क्र.०१ सुमेध सत्यवान कांबळे यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता त्यांनी असे कथन केले आहे की, दि. १६/०२/२०२४ रोजी ते त्यांच्या कामानिमित्त राजगड पोलिस स्टेशन येथे गेले होते. त्यावेळी पोलिसांनी त्यांना मुद्देमाल जप्त करावयाचा असल्याने पंच म्हणून राहण्यास सांगितले. तेथे दारूच्या बाटल्या होत्या. टँगो पंचच्या एकूण १५ बाटल्या प्रत्येकी ९० मिली क्षमतेच्या व प्रत्येकी ३५ रुपये किमतीच्या होत्या. सदर बाटल्या पोलिसांनी त्यांच्या समक्ष जप्त करून सिलबंद केल्या. त्यानंतर पोलिसांनी त्यांच्या समक्ष जप्ती पंचनामा तयार केल्याचे कथन करुन नि.क्र. १० कडील पंचनामा त्यांनी न्यायालयासमक्ष ओळखला आहे. उलटतपासणीत त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांनी पूर्वी होमगार्ड म्हणून काम केल्यामुळे पोलिसांशी त्यांचे चांगले संबंध होते, होमगार्ड असताना ते बऱ्याचवेळा पोलिसांनी सांगितल्याप्रमाणे सह्या करीत होते. तसेच जप्त केलेला मुद्देमाल पोलिस स्टेशन येथे टेबलावर ठेवलेला होता. सदर मुद्देमाल कोणी व कोणाकडून आणला याबाबत त्यांना माहिती नसल्याचे, पंचनाम्यावर त्यांनी पोलिसांच्या सांगण्यावरून सही केल्याचे त्यांनी स्पष्टपणे मान्य केले आहे. तसेच जप्त मुद्देमाल निश्चित कोणाच्या ताब्यातून जप्त केला याबाबत त्यांना माहिती नसल्याचेही त्यांनी स्पष्टपणे मान्य केले आहे.

०८. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले तपास अधिकारी सा.क्र. २ मंगेश दत्तात्रय कुंभार यांच्या पुराव्यात त्यांनी कथन केले आहे की, दि. १६/०२/२०२४ रोजी ते राजगड पोलिस स्टेशन येथे पोलिस शिपाई म्हणून कार्यरत असताना ते पी.एस.आय. सुतनासे व पोलिस नाईक कोंढाळकर यांच्यासह नसरापूर बीट हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना पी.एस.आय. सुतनासे यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मौजे नायगाव येथे डोंगराजवळ जितेंद्र पांडुरंग कुंभार हा आपल्या कब्जात बिगर परवाना देशी दारूची विक्री करीत आहे. त्यानुसार त्यांनी दोन पंचांना घटनास्थळी बोलावून घेतले व मिळालेल्या बातमीचा आशय समजावून सांगितला. पंचांनी सहमती दर्शविल्यानंतर ते व पंच मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी पायी चालत गेले. तेथे सायंकाळी ५.२५ वा. छापा टाकला असता दारू पिण्यासाठी आलेले लोक त्यांना पाहून पळून गेले. त्यावेळी जितेंद्र पांडुरंग कुंभार यास जागीच पकडण्यात आले. पुढे त्यांनी असेही कथन केले की, त्याच्या ताब्यातून टँगो पंच नावाच्या ९० मिली क्षमतेच्या प्रत्येकी ३५ रुपये किमतीच्या एकूण १५ बाटल्या असा एकूण ५२५ रुपयांचा प्रोहिबिशनचा माल पोलिस नाईक कोंढाळकर यांनी पंचांसमक्ष जप्त केला. त्यानंतर त्यांनी स्वतः आरोपीविरुद्ध सरकारतर्फे फिर्याद दिल्याचे कथन करुन नि.क्र. ११ कडील फिर्याद व नि.क्र. १२ कडील छापील प्रथम खबर न्यायालयासमक्ष ओळखली आहे.

०९. बचावपक्षामार्फत घेण्यात आलेल्या उलटतपासात सदर साक्षीदाराने नायगाव ते राजगड पोलिस स्टेशन हे अंतर दीड किलोमीटर आहे, फिर्यादीमध्ये ते किती किलोमीटर पायी चालत गेले याचा उल्लेख नाही. तसेच छापा टाकण्यापूर्वी बनावट ग्राहक पाठवून पूर्वखात्री केली नव्हती, दारू पिण्यासाठी आलेले निश्चित किती लोक घटनास्थळावरून पळून गेले याचा उल्लेख फिर्यादीमध्ये नसल्याचे, एकट्या आरोपीला पळून जाताना पकडल्याचे त्यांनी स्पष्टपणे मान्य केले आहे. तसेच आरोपीला त्यांच्यापैकी नेमके कोणी पकडले तसेच आरोपीची झडती नेमकी

कोणी घेतली याचा उल्लेख फिर्यादीमध्ये नसल्याचे देखील मान्य केले आहे. तसेच मुद्देमाल शासननिर्मित असल्यामुळे त्यावर बॅच क्रमांक व अनुक्रमांक नमूद असतात, तथापि जप्त बाटल्यांवरील अनुक्रमांक, उत्पादन दिनांक तसेच कोणत्या अनुक्रमांकाची बाटली नमुना म्हणून बाजूला काढली होती हे त्यांना सांगता येत नसल्याचे देखील स्पष्टपणे नमुद केले आहे. तसेच बातमीमध्ये आरोपीचे नाव समजले होते, असेही त्यांनी नमूद केले आहे.

१०. अभियोगपक्षाने कथनानुसार आरोपीच्या ताब्यात कथीत मुद्देमाल मिळाल्याबाबत सदर साक्षीदारांचे पुराव्याचे अवलोकन करता तफावत व विसंगती दिसून येते. तसेच अभियोग पक्षाने इतर साक्षीदारांचा पुरावा न्यायालयासमक्ष सादर केला नाही.

११. महाराष्ट्र मद्यनिषेध अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा शाबीत करणेकामी आरोपीच्या ताब्यात दारु सापडणे व ती योग्यरीत्या जप्त होणे आवश्यक आहे. फौजदारी दंड संहिताचे कलम १००(४) नुसार किमान दोन स्वतंत्र साक्षीदारांच्या समक्ष सदरची जप्ती होवून ती न्यायालयात शाबीत होणे अनिवार्य होते. तपासी यंत्रणेने मिळालेल्या बातमीनुसार नियमावली अन्वये प्रत्येक अनिवार्य प्रक्रिया पाळून, त्यानुसार आवश्यक नोंदी करुन, घटनास्थळी जावुन, पंचासमक्ष पंचांसह छापा टाकून प्रतिबंधित माल जप्त करेपर्यंतची संपूर्ण श्रृंखला न्यायालयापुढे शाबीत करावयाची असते. तपासी यंत्रणेने सदर केसमध्ये छापा टाकण्यासाठी वापरलेल्या सरकारी वाहनाचा तपशिल, छापा टाकतेवेळेस असलेल्या कर्मचाऱ्यांचे टिपण, प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचा पुरावा इत्यादी बाबी न्यायालयापुढे आणणे आवश्यक होते. जेणेकरुन अभियोगपक्षातर्फे तपासलेल्या साक्षीदारांच्या कथनास दुजोरा मिळाला असता. अभियोगपक्षाने त्यानुसार पुरावा सादर केलेला नाही. महत्वाची बाब म्हणजे प्रस्तुत खटल्यातील फिर्यादी यांची साक्ष देखील नोंदविलेली नाही.

१२. महाराष्ट्र मद्यनिषेध अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) नुसार गुन्हा शाबीत करणेकामी आरोपीने त्याच्या कब्जात बेकायदा बिगरपरवाना देशी दारु टँगो पंच कंपनीच्या ९० मिली मापाच्या १५ बाटल्या प्रत्येकी कि. ३५/- प्रमाणे असा एकुण ५२५/- रु. किमतीचा प्रोव्हीबीशन गुन्हयाचा माल जवळ बाळगुन त्याच्या ओळखीच्या लोकांना विक्री करीत असताना मिळुन आला ही बाब अभिलेखावरील पुराव्यावरुन संशयापलिकडे जावुन सिध्द होवू शकलेली नाही. सबब, सबळ पुराव्या अभावी प्रश्न क्र.०१ करीता मी, नकारार्थी उत्तर देवून प्रश्न क्र.०२ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

:: **आ दे श** ::

| | |
|---|---|
| ०१ | आरोपी **जितेंद्र पांडुरंग कुंभार** हयांची महाराष्ट्र मद्यनिषेध अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) मधुन फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| ०२ | आरोपीने यापुर्वी दिलेला जामीन कदबा रद्द करुन त्यास खुले करण्यात येते. |
| ०३ | आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७(अ) अन्वये रुपये पन्नास हजार इतक्या रकमेचे नविन बंधपत्रे व जामिनपत्रे दाखल करावेत. |
| ०४ | सदर गुन्ह्यात जप्त असलेल्या मुद्देमालाची विल्हेवाट आवाहन कालावधी संपल्यानंतर मुंबई दारुबंदी जप्त केलेल्या किंवा हक्क काढुन घेतलेल्या वस्तू (विल्हेवाट) नियमन, १९५३ मधील तरतुदीस अधिन राहुन करावी. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात लिहणेत व घोषित करण्यात आला.) |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by JADHAV MEENA WAMAN
Date: 2026.06.06 12:31:47 +0530

**ठिकाण : भोर** **( मीना वा. जाधव )**

**दिनांक :०६.०६.२०२६.** **न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, भोर**

**प्रमाणपत्र**

मी अशी खात्री देतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर मुळ आदेशाप्रमाणे प्रत्येक शब्द बरोबर आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | एम.एस. कोंढरे, नि.श्रे. |
| न्यायालयाचे नाव | - | मे. श्रीमती एम.व्ही. जाधव, प्र.वर्ग. न्या.दं. भोर |
| निकाल तारीख | - | ०६/०६/२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केल्याची तारीख | - | ०६/०६/२०२६ |
| अपलोड केल्याची तारीख | - | ०६/०६/२०२६ |